महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

## कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)

# यशोगाथा

## कांदा पिक शेतीशाळा

**गांवाचे नांव - शेगांव (बु.), ता. वरोरा, जि. चंद्रपूर**
**शेतकरी संख्या - २५**




**-: कार्यालय :-**

**तालुका कृषि अधिकारी**
**वरोरा**

# यशोगाथा

- **आत्मा अंतर्गत कांदा शेतीशाळा**
- **कालावधी - ६ आठवडे**
- **पिक - कांदा**
- **एकूणक्षेत्र - ४० एकर**
- **उत्पादन - ३० ते ३५ टन प्रती हेक्टर**
- **शिफारस केलेले तंत्रज्ञान - एकात्मिक किड, रोग व अन्नद्रव्य व्यवस्थापन**
- **सर्व साधारण शेतकरी अवलंबित असलेले तंत्रज्ञान - पारंपारिक पध्दतीने अबलंबित असलेले किड व रोग व्यवस्थापन**
- **सुधारीत तंत्रज्ञान अवलंब न करण्याची कारणे शेतक-यांना योग्य वेळी तांत्रिक मार्गदर्शन न मिळणे**

वरोरा हा तालुका खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, तूर व भात पिक व रब्बी हंगामात गहु, हरभरा, ज्वारी पिकासाठी प्रसिध्द आहे. त्यातकांदा लागवडी खालील क्षेत्र हे अल्प असुन या क्षेत्रातील हवामानाचा विचार करता रब्बी हंगामात कांदा पिक उत्तम प्रकारे येते. कांदा पिकावरील सुधारीत लागवड तंत्रज्ञान तसेच कांदा सुकविणे, कांदा साठवणुक सुधारित चाळ, रोग व किडींचा प्रादुर्भाव व त्यासाठी मार्गदर्शन आवश्यक असल्याने शेतीशाळेचे निवड केली. कांदा पिकविण्यास इच्छुक शेतक-यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये महालगांव (बु.) व शेगांव (बु.) परिसरातील संताजी शेतकरी गट, शेगांव (बु.) या गटातील व गटास संलग्न २५ शेतक-यांसाठी श्री. विनोद देवराव राऊत, मौजा शेगांव (बु.), तालुका वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांच्या शेतावर दिनांक १ नोव्हेंबर २०१८ रोजी पासुन शेतीशाळा घेण्याचे ठरले व त्यास वरिष्ठ कार्यालयाकडून मंजूरी घेण्यात आली.

तंत्रज्ञान अवलंबविण्यात असलेल्या उणिवा जाणून घेतल्या त्यामध्ये प्रात्यक्षिक राबवितांना पारंपारिक पध्दती पेक्षा गादी वाफा वापरुन कांदा रोपे तयार करण्याची पध्दत वापरल्यामुळे रोपांची वाढ एकसारखी झाली. रोपांच्या मुळाभवती पाणी साचुन राहिले नाही व रोपे कुजण्याचा प्रकार आढळला नाही. तसेच मुळांव्दारे अन्नद्रव्यांचे शोषण चांगले होवुन गाठ जाड व लवकर तयार झाल्या व उगवण क्षमता वाढली.

- **पिक वाढीच्या संवेदनशिल अवस्था**

  १. बीज प्रक्रीया करुन रोपांची लागवड करणे व रोपांची योग्य अंतरावर पुर्नलागवड

२. पी.एस.बी. जिवाणु संवर्धकाचा तसेच मका, चवळी सारख्या सापळा पिकाचा वापर करणे.

३. एकात्मिक खत व्यवस्थापन

४. एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन (रासायनिक व जैविक किड व बुरशीनाशकाचा तसेच स्टीकी ट्रॅपचा वापर)

५. कांदा पिकाची काढणी आणि सुकविणे, प्रतवारी व पॅकिंग, विक्री

- **शेतीशाळा सत्र व मार्गदर्शक**

| अ.क्र. | शिर्षक | मार्गदर्शक |
|---|---|---|
| १ | शेतीशाळेची प्रस्तावना महत्व प्रगतशील शेतकरी व प्रशिक्षणार्थी निवड. माती परीक्षण, पुर्वमशागत, जमीनिची निवड, हवामान. | श्री.व्ही.पी.काळे, कृषी पर्यवेक्षक, शेगांव बु.<br>श्री.अरुण डी. ताले, कृषी सहाय्यक, गोंडपिपरी<br>श्री.व्ही.डी.घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा<br>कु.एल.एस.दुर्गे, कृषी सहाय्यक, सालोरी |
| २ | बियाणे लागवड - वाणांची निवड, बिज प्रक्रिया व कांदा रोपे तयार करणे, पुर्व मशागत व पुर्नलागवड | डॉ.एस.एम.घावडे (प्रमुख पैदासकार, मिरची व भाजिपाला संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला),<br>डॉ.फड (सहाय्यक पैदासकार, मिरची व भाजिपाला संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला),<br>श्री.एस.बी.राजवाडे (उ.वि.कृ.अ., वरोरा), |
| ३ | सुधारीत पेरणीच्या पध्दती (बीबीएफ/सरी - वरंबाइ.) आंतर मशागत, तण व्यवस्थापण. एकात्मिक खत व्यवस्थापन | श्री.अरुण डी. ताले, कृषी सहाय्यक, गोंडपिपरी<br>श्री.व्ही.डी.घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा<br>कु.एल.एस.दुर्गे, कृषी सहाय्यक, सालोरी |
| ४ | कांदा पिका वरील महत्वाचे रोग व किडी - ओळख व एकात्मिक व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन. | श्री.अरुण डी. ताले, कृषी सहाय्यक, गोंडपिपरी<br>श्री.व्ही.डी.घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा<br>श्री.आर.एस.जाधव, कृषी सहाय्यक, शेगांव (बु.) |
| ५ | कांदा पिक काढणी व कांदा सुकविणे | श्री.व्ही.पी.काळे, कृषी पर्यवेक्षक, शेगांव बु.<br>श्री.अरुण डी. ताले, कृषी सहाय्यक, गोंडपिपरी<br>श्री.व्ही.डी.घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा |
| ६ | कांद्याची सुधारीत चाळ / साठवणुक, कांदा प्रतवारी व विक्री व्यवस्थापन, बाजार भावाची माहिती व समारोप. | श्री.अरुण डी. ताले, कृषी सहाय्यक, गोंडपिपरी<br>श्री.व्ही.डी.घागी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, वरोरा<br>कु.एल.एस.दुर्गे, कृषी सहाय्यक, सालोरी<br>श्री.आर.एस.जाधव, कृषी सहाय्यक, शेगांव (बु.) |

- **शेतकरी विद्यार्थी प्रशिक्षण साहीत्य**

  कांदा लागवड पुस्तीका, बॅग, टोपी, पॅड, स्केलपट्टी, रेझर, रायटींग पॅड, पेन, स्केचपेन, पेन्सील, रबर, मित्र किटक घडीपत्रका, ब्रश, रजिस्टर इत्यादी.

- **शेतीशाळा प्रात्यक्षिक निविष्ठा**

  बियाणे, जैविक व रासायनिक खते, जैविक व रासायनिक किटकनाशके व बुरशीनाशके, जिवाणु सवंर्धक इत्यादी.

- **शेतीशाळेमुळे झालेला परिणाम (Impact)**

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा या तालुक्यात खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, तूर व भात पिक व रब्बी हंगामात गहु, हरभरा, ज्वारी हे महत्वाचे पिक आहेत. परंतु या पिकांचे व्यवस्थापनासाठी लागणारा खर्च व मिळणारे उत्पादन याचा विचार करता रब्बी हंगामाध्ये कांदा हे पिक उत्तम प्रकारे घेतले जावू शकते. तसेच विक्री साठी स्थानिक बाजार व नागपूर आणि हैदराबाद बाजार देखिल जवळ येतो. रब्बी हंगामामध्ये कांदा पिकाची शेतीशाळा घेवून शेतक-यांना माती परीक्षण, पुर्वमशागत, जमीनिची निवड, हवामान, बियाणे लागवड - वाणांची निवड, बिजप्रक्रिया व कांदा रोपे तयार करणे, पुर्व मशागत व पुर्नलागवड, सुधारीत पेरणीच्या पध्दती (बीबीएफ/सरी- वरंबाइ.) आंतर मशागत, तण व्यवस्थापण. एकात्मिक खत व्यवस्थापन, कांदा पिकावरील महत्वाचे रोग व किडी - ओळख व एकात्मिक व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कांदा पिक काढणी व कांदा सुकविणे, कांद्याची सुधारीत चाळ / साठवणुक, कांदा प्रतवारी व विक्री व्यवस्थापन, बाजार भावाची माहिती या विषयांवर झालेल्या **प्रात्यक्षिक आधारीत मार्गदर्शनामुळे** शेतक-यांना जास्त उत्पादन देवून उत्तम आर्थिक परतावा मिळाला.

शेगांव (बु.) हे गांव वरोरा तालुक्यात येत असुन या गावातील वहीता खालील क्षेत्र ६७४.५० हेक्टर आहे. या गावात रब्बी हंगामात मुख्य पिक हरभरा व गहु असुन सदर शेतीशाळेमुळे कांदा लागवड करणा-या व लागवड करु इच्छीणारे शेतक-यांना कृषि विभाग - कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत कांदा पिकावरील शेतीशाळेच्या माध्यमातुन कृषि विद्यापिठ व इतर विविध तज्ञांकडून देण्यात आलेल्या मार्गदर्शनामुळे शेतकरी प्रशिक्षित झाले. परंपरागत पिक पध्दतीत बदल करुन सुधारीत तंत्रज्ञान वापरुन कांदा पिकाच्या लागवडीकडे शेतक-यांचाकलवाढला तसेच शेतीशाळेमुळे शेतक-यांना कमी उत्पदन खर्चात जास्तीत जास्त व उत्तम प्रतिचे कांदा पिक उत्पादन घेणे शक्य झाले.

वेळोवेळी पिक व्यवस्थापनामध्ये येणा-या अडचणी दूर करण्यासाठी कांदा पिकाची शेतीशाळा राबवून शेतक-यांना पिकाचे अवस्थेनुसार व गरजेनुसार लागवड पूर्व तयारी ते कांदा काढणी व काढणी पश्चात व्यवस्थापन पर्यंत तज्ञांव्दारे मार्गदर्शनामुळे शेतक-यांना कांदा पिक लागवडीची उपयुक्ता पटली. कांदा पिकाचे क्षेत्रविस्ताराचे दृष्टीने व शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्याने तालुक्यातील इतर शेतक-यांमध्ये सुध्दा माहितीचा प्रचार प्रसार झाला शेतकरी पुढील वर्षी कांदा पिकाखालील क्षेत्र वाढविण्यास उद्युक्त झाले. परीणामी त्याचाच भाग म्हणून शेतकरी कांदा लागवडीस इच्छुक असुन एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) अंतर्गत तालुक्यात ९४ शेतक-यांनी कांदा चाळ उभारणी करिता ऑनलाईन अर्ज केलेले आहेत.

- **शेतीशाळेच्या माध्यमातुन शेतक-यांनी अवलंबलेली पिक पध्दती**
  - विद्यापिठातील सुधारीत वाणाचा वापर.
  - बिज प्रक्रीया
  - गादी वाफ्यावर रोपवाटीका तयारकेली.
  - बीबीएफ/सरी - वरंबा पध्दतीने पुर्नलागवड

# मौजा शेगांव (बु.) ता. वरोरा येथे आयोजितकांदापिक शेतीशाळा





शेतीशाळेस उपस्थित शेतक-यांना कांदा पिक लागवड तंत्रज्ञान, तण व्यवस्थापन व किडरोग व्यवस्थापन इत्यादी विषयावर डॉ.एस.एम.घावडे (प्रमुख पैदासकार, मिरची व भाजिपाला संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला), डॉ.फड (सहाय्यक पैदासकार, मिरची व भाजिपाला संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला), श्री.एस.बी.राजवाडे (उ.वि.कृ. अ., वरोरा)





खताचा समतोल वापर, पिकाला लागणारी खते व सुक्ष्म अन्नद्रव्याचे महत्व व त्याची पिकास गरज तसेच रोग व किडीची ओळख व उपाययोजना इ. विषयांवर मार्गदर्शन करतांना मार्गदर्शक श्री.व्ही.पी.काळे (कृषी पर्यवेक्षक, शेगांव बु.), श्री.व्ही.डी.घागी (तालुका तंत्रज्ञान व्यवथापक, वरोरा), कु.एल.एम.दुर्गे (कृ.स. सालोरी)









शेतीशाळेस उपस्थित शेतक-यांना खत व सुक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन, सिंचन व्यवस्थापन, ठिबक व तुषार सिंचनाचे फायदे इ.विषयांवर मार्गदर्शन करतांना मार्गदर्शक श्री.व्ही.पी.काळे (कृषी पर्यवेक्षक, शेगांव बु.) श्री.अरुण डी. ताले (कृषी सहाय्यक, गोंडपिपरी),श्री.व्ही.डी.घागी (तालुका तंत्रज्ञान व्यवथापक, वरोरा)





शेतीशाळेस उपस्थित शेतक-यांना काढणी, साठवणुक, विक्री व्यवस्थापन, बाजार भावाची माहिती इ. विषयांवर मार्गदर्शन करतांना मार्गदर्शक श्री.अरुण डी. ताले (कृषी सहाय्यक, गोंडपिपरी),श्री.व्ही.डी.घागी (तालुका तंत्रज्ञान व्यवथापक, वरोरा), श्री.आर.एस.जाधव (कृ.से.शेगांव बु.)

-------।।-------